An International Peer Reviewed & Referred

INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# विकासाचा अवकाश प्रदेश सिध्दांत -(लेव्हविगोत्सकी)

**प्रा.राठोड गुलाबराव श्रीरंग**

*सहाय्यक प्राध्यापक. एम.एड.महाविदयालयसोनई. ता.नेवासा जि.अहमदनगर.*

## सारांश

*विदयार्थी स्वत: अनुभवांना अर्थलावूनस्वत: ज्ञान मिळवतो.हा ज्ञानरचनावादीविचार आतासार्वत्रिकझालेला आहे. प्रस्तुत पेपरमध्ये विदयार्थ्याच्या ज्ञानाचीरचना कशी तयार होते,विदयार्थी कोणत्या अनुभवांना अर्थ लावतात.अध्ययन अर्थपूर्ण घडण्यासाठी शिक्षक विदयार्थी आंतरक्रिया कशा असाव्यात.यासंदर्भात लेव्हविगोत्सकी(Lev Vygotsky) यांचा Zone of proximal development (ZPD) विकासाचा अवकाश प्रदेश सिध्दांत तसेचR.GallimoreआणिTharp R.G यांची विदयार्थ्यांच्या अध्ययनाची चार स्तरीय प्रतिकृती four stage model of ZPD कशा प्रकारे कार्य करतातव या मॉडेलची अमंलबजावणी कशी करावी.जेणेकरुनविदयार्थ्याच्या प्रगतीचे टप्पे शिक्षकालासमजण्यात मदत होईल.याचे सविस्तरविवेचन प्रस्तुत पेपरमध्ये करण्यात आलेले आहे.*

## प्रास्ताविक

मुलांचा उमलल्या मनाला संस्कारानेविशिष्ट वळण लावण्याचे कार्य कोण करतो? अर्थातच शिक्षक.मग शिक्षकहा ख-या अर्थाने समाजाचा शिल्पकार नाही काय ? आतापर्यंत शिक्षक जगभरातील शिक्षणव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा घटकराहिलेला आहे आणि यापुढेही त्याचे स्थान आबाधितराहील मात्र ज्याप्रमाणात शिक्षण बदलते.विदयार्थ्यांच्या गरजा बदलतील त्याप्रमाणात शिक्षकानेस्वत:ला बदलायला हवे.

शिक्षणहक्क कायदयाच्या कलम ८ नुसार प्रत्येक बालकालागुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची जबाबदारीशासनाची पर्यायाने शिक्षकांची आहे.म्हणून २००५ चा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडाहा ज्ञानरचनावादानुसार तयार करण्यात आलाव केंद्र शासनाने ३१ मे २०१० रोजीचाशासन निर्णयाद्वारे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ लाशिक्षणहक्क कायदयासाठींचा अभ्यासक्रम आराखडा म्हणून मान्यता दिलेली आहे.त्यामुळे प्रत्येक बालकालागुणवत्तापूर्ण शिक्षण देणे बंधनकारक आहे.

गुणवत्तापुर्ण शिक्षणाचासार्वत्रिकीकरणासाठीसर्व विदयार्थ्याच्या बाबतीत निष्पत्तीची समानता हा मूलभुत नियम प्रस्थापित करण्यात आलेला आहे.

विदयार्थ्यांपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहचवणे हया जबाबदारीचे शिवधनुष्य आताशिक्षकालाचउचलावेलागणार आहे. यासाठी गरज आहे ती एकानिश्चित कालबध्द रोडमॅपची.

या रोडमॅपची भूमिका बजावण्यात ज्ञानरचनावादीविचार मोठया प्रमाणात शिक्षकाला मदत करुशकेल.

ज्ञानरचनावादी अध्यापनामुळे विदयार्थ्यांच्या नवीन ज्ञानरचनेससुरुवातहोतेच पण विदयार्थी कृतिशील राहतो.विदयार्थ्यांच्या स्वत:च्या क्षमतेला विचाराला,कृतीला अध्यापनात वाव मिळून शिकणेही एक आनंददायी प्रक्रिया होते.

**३.ज्ञानरचनावाद म्हणजे काय ?**

**अनुभवांचा आधारे व्यक्तीने स्वत: नवीन ज्ञान निर्मिती करणे म्हणजे ज्ञानरचनावादहोय.**

ज्ञानाचीरचना कार्यान्वित ठेवणेहा ज्ञानरचनावादाचा गाभा आहे,तर स्वत:च्या अनुभवांच्या आधारे व्यक्ती स्वत: च्या ज्ञानाची पुर्नरचना करतोहे ज्ञानरचनावादाचेवैशिष्ट्ये आहे.

म्हणून या ज्ञानरचनावादानुसार अध्ययन कसेघडतेहे पाहावयाचे असेलतरलेव्हविगोत्सकी यांच्या Zone of proximal development (ZPD) विकासाचा अवकाश प्रदेश सिध्दांत आपल्याला समजून घ्यावा लागेल.

**लेव्हविगोत्सकी**

यांच्या मतानुसार

**व्यक्तीच्या ज्ञानरचनेसाठी सामाजिक,सांस्कृतिक व भाषिक आंतरक्रिया युक्त वातावरणहाच माहितीचा स्त्रोत असतोव याच स्त्रोतानुसार व्यक्तीच्या ज्ञानाचीरचनाहोत असते.**

**४. विकासाचा अवकाश प्रदेश सिध्दांत -(लेव्हविगोत्सकी)**

**Zone of proximal development (ZPD) - (Lev Vygotsky)**

Lev Vygotsky – often quoted definition of zone of proximal development is 'The distance between the actual development level as determined by independent problem solving and the level of Potential development as determined through problem solving under Adult guidance,or in collaboration with more capable peers.'

(Vygotsky .1978 p.86)

**(कोणत्याही व्यक्तीची स्वतंत्ररित्या समस्या निराकरणाची सदयस्थिती आणिइतर कार्यक्षम सहका-यांचा मदतीने समस्या सोडवण्याच्या विकासात्मक पातळी मधील अंतर म्हणजेविकासाचा अवकाश प्रदेश होय.)**

**या सिध्दांतानुसार**




**पहिला टप्पा-** What i can't do – (मी काय करुशकत नाही)

यामध्ये अध्ययनकर्ता स्वतंत्ररित्या एखादया समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत असतो.या टप्प्यावर ती समस्या सुटेलच असे नाही या टप्प्यावर व्यक्तीच्या आकलनाची सदयस्थिती समजते.

**दुसरा टप्पा -** What i can do with help – (मी इतरांची मदत /सहकार्य घेऊन काय करुशकतो.)

या टप्प्यावर विदयार्थ्याला शिक्षककिंवा कार्यक्षम सहकारी अर्थपूर्ण संदर्भ,परस्परसंबंधित समृध्द अशा सामाजिक आंतरक्रिया,अर्थपूर्ण सूचना योग्य संदर्भ,सर्वंकष वसखोल अनुभव देऊन त्याच्या अध्ययनात सकारात्मक बदलघडवून आलेलादिसून येतो.

**तिसरा टप्पा -** What i can do –(मी काय करुशकतो.)

या टप्प्यात विदयार्थ्याला किंवा अध्ययन कर्त्याला सर्वप्रकारचे अध्ययन अनुभव मिळाल्यामुळे तो काय करु शकतो.या विकासाचा संभाव्य/नैसर्गिक पातळीपर्यंत तो पोहोचतो.

म्हणजेच मी काय करुशकत नाही आणि काय करुशकतो यामधला अनुभव / फरक हाविकासाचा अवकाश प्रदेशहोय.

म्हणजेच इतरांच्या मदतीशिवाय आणि मदतीने मिळवलेल्या अध्ययन अनुभवातील फरक म्हणजेच विकासाचा अवकाश प्रदेश होय.


यावरुन ,

**विदयार्थी स्वतःच्या ज्ञानाचीरचनास्वतः अनुभव घेऊन करतोहे समजते.**

जर या ZPD सिध्दांताचा वापर शिक्षकाने आपल्या अध्यापनात केला तर कोणतेही मुल कोणताही विषय यशस्वीरित्या शिकूशकते.

त्यासाठी या ZPD चा वापर अध्यापनात कसाकेलाम्हणजे विदयार्थ्यांना समृध्द अध्ययन अनुभव मिळतील यासाठीfour stage model of ZPD चा अभ्यास करावालागेल.

## 5.Four stage model of ZPD




### Four stage model of ZPD नुसार

**पहिला टप्पा :-**

यामध्ये विदयार्थ्यांच्या ज्ञानरचनेसाठी कार्यक्षम व्यक्तींकडून सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. त्या पालक, शिक्षक, मित्र, मार्गदर्शक, तज्ञ व्यक्ती असतात.

**दुसरा टप्पा :-**

यामध्ये विदयार्थी त्याला हव्या त्या सुविधानिश्चित अटींवरघेतो. या टप्प्यावर त्याच्या क्षमता विकसितहोतात. हया सुविधा म्हणजेच स्पष्ट सूचना,अर्थपूर्ण संदर्भ,कृतियुक्त तसेच रचनात्मक परस्परसंबंधित असे समृध्द अनुभव असेल तरच विदयार्थ्यांच्या क्षमता विकसितहोतात.

**वरील दोन्ही टप्पे हेविकासाचा अवकाश प्रदेश म्हणून ओळखले जातात.**

**तिसरा टप्पा :-**

यामध्ये विदयार्थी / व्यक्ती ज्ञानाचे सामान्यीकरण करतोहे ज्ञान उपयोजनाच्या पातळीवर यांत्रिकरित्या व तांत्रिकरित्या कायम स्वरुपी जतन करुनठेवतो.

**चौथा टप्पा :-**

चौथ्या टप्प्यामध्ये तो मागे वळूनसुरुवातीचे अनुभवामध्ये नवीन ज्ञानघालून ज्ञानाचे पुर्नसंघटन करतो. यावरुन असेलक्षात येते की, विदयार्थ्याला कार्यक्षम व्यक्तीकडून योग्य प्रकारचे समृध्द असे अध्ययन अनुभव मिळाले तरच विदयार्थी स्वत: ज्ञानाचीरचना करतो.

**६. निष्कर्ष :**

वरीलसर्व माहितीवरुन ज्ञानरचनावादी संकल्पना Zone of proximal development (ZPD)नुसारविदयार्थ्यांचे अध्ययन कसेघडते याबाबत खालीलनिष्कर्ष समोर येतात.

१.अनुभवातूनच ज्ञानाचीरचनाहोते.

२.विदयार्थ्यांना ज्ञान / संकल्पना स्पष्ट होण्यासाठी सहकार्यात्मक व सकारात्मक सहभागात्मक आंतरक्रिया आवश्यक असतात.

३.विदयार्थी स्वत:च्या ज्ञानाचीरचनास्वत: करतो.

४.अध्ययन ही कृतिशील, कृतियुक्त, प्रक्रिया आहे.

५.अनुभवांना अर्थ देण्याच्या कृतियुक्त प्रक्रियेतून नवीन ज्ञानाची निर्मिती होते.

६.अध्ययनात प्रत्येकाने आपल्या पुर्व अनुभवांवर आधारित लावलेल्या अर्थानुसार, चर्चेद्वारे नवीन ज्ञान निर्मिती होते.

७.अध्ययन होण्यासाठी आदर्श सामाजिक सांस्कृतिकव भाषिक वातावरणाचीगरज असते.

८.अध्ययनासाठी अर्थपूर्ण सुचनांचीगरज असते.

९.विदयार्थ्यांने कोणती माहिती, कशी मिळवावी, कोठे मिळेल, त्या माहितीवर प्रक्रिया कशी करावी याबाबत सर्वोत्कृष्ठसूचनांचास्त्रोत अध्ययनासाठी उपयुक्त ठरतो.

१०.समस्या गर्भ परिस्थीती अध्ययनास कारणीभूत ठरते.

११.विदयार्थ्यांच्या क्षमता, वय,कुवत,कौशल्ये, आवड या गोष्टींचाविचार योग्य अध्ययनासाठी पूरक ठरतो.

१२.विदयार्थी आदर्श अनुकरणातूनच स्वत:च्या ज्ञानाचीरचना करतो.

१३.ज्ञानहे कायमस्वरुपी नसूनसतत बदलत असते.

१४.विदयार्थ्यांच्या ज्ञान निर्मितीसाठी नैसर्गिकववास्तववातावरण आवश्यक असते.

१५.अध्ययनात बालकांच्या शोधन प्रवृत्तीवर भर दिलागेला पाहिजे.

१६.आदर्श अध्ययनासाठी(Accommodation)समाविष्टीकरण(Assimilation) सात्मीकरण म्हणजेच प्रत्येक वेळेस नव्या परिस्थितीत विविध अनुभवांचे एकीकरण करणेगरजेचे असते.

वरीलनिष्कर्षांचाविचार करुन विदयार्थ्यांना घडवण्याची,गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची शक्यता हजार पट आहे.गरज आहे फक्त शिक्षकांच्या कार्यक्षम,आणि प्रामाणिक प्रयत्नांची

**धन्यवाद.**

**७. संदर्भसूची**

*Bransford, J., Brown, A., & Cocking, R. (2000). How People Learn : Brain, Mind, and Experience & School. Washington, DC : National Academy Press.*

*Four-Stage Model of ZPD. (No date). North Central Regional Educational Laboratory. Retrieved October 12,2002from http://www.ncrel.org/sdrs/areas/issues/students/learning/lrlzpda.htm*

*Janet Swanson, and Anne West Scaffolding - Emerging Perspectives on Learning, Teaching and Technology Lindsay Lipscomb, The University of Georgia.*

*Jaramillo, J. (1996). Vygotsky'ssociocultural theory and contributions to the development of constructivist curricula. Education 117 (1), 133-140.*

*R.G. Thorp and R.Gallimore (1988) Rousing minds to life four stage model (ZPD)(P.35) cambrige university press (Info@ncrel.org)*

*Social Development Theory. (No date). Retrieved Novmber3,2002,fromhttp://tip.psychology.org/vygotsky.html)*

*काळपांडे वसंत (२७ जाने २०१३), संभ्रमित शिक्षकअनदिशाहीनशिक्षण , लोकसत्ता, लोकरंग पुरवणी, पृष्ठ क्र. ३.*

*चव्हाण माधव, (२७ जानेवारी २०१३), शिक्षणहक्काचा अनर्थ , लोकसत्ता, लोकरंग पुरवणी पृष्ठ क्र. ७.*

*मॅटेरो विवेक, महाशब्दे गीता, (५ फेब्रुवारी २०१३), महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्राचेनिदान, दैनिकलोकसत्ता, संपादकीय पृष्ठ क्र. ७.*

**अनुक्रमणिका**



| अ.क्र. | घटकाचे नाव | पृष्ठ.क्र. |
|---|---|---|
| १. | सारांश | १ |
| २. | प्रास्ताविक | २ |
| ३. | ज्ञानरचनावाद म्हणजे काय ? | ३ |
| ४. | विकासाचा अवकाश प्रदेश सिध्दांत- (लेव्हविगोत्सकी) Zone of proximal development (ZPD) - (Lev Vygotsky) | ३-४-५ |
| ५. | Four stage model of ZPD विकासाचा अवकाश प्रदेश - चार स्तरीय प्रतिकृती Tharp R.G. and Gallimore R. | ५-६ |
| ६. | निष्कर्ष | ७ |
| ७. | संदर्भ सूची | ८ |